## थोडक्यात...

# राज्य ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेच्या प्रदेश उपाध्यक्षपदी फिरोज मासुलदार



**परभणी** - महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची मुंबई येथे पार पडलेल्या बैठकीत संघटनेच्या प्रदेश उपाध्यक्षपदी लातूर येथील सामाजिक कार्यकर्ते व मुस्लिम सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष फिरोज मासुलदार यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. या बैठकीस उपस्थित असलेले संघटनेचे मुख्य मार्गदर्शक तसेच कॅबिनेट दर्जा असलेले आमदार प्रसाद लाड यांच्या हस्ते मासुलदार यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी त्यांनी मासुलदार यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देत संघटनेच्या बळकटीकरणासाठी प्रभावी कामगिरी करावी, असा विश्वास व्यक्त केला. बैठकीस संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विलास कुमखवार, प्रदेश कार्याध्यक्ष दयानंद एगुडे, प्रदेश सचिव जनार्दन मुंढे तसेच मराठवाडा विभागीय अध्यक्ष नवनाथ नारोळे यांची प्रमुख उपस्थिती होती. महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी संघटना राज्यभर कार्यरत असून ग्रामपंचायत स्तरावरील कर्मचाऱ्यांचे प्रश्न शासन दरबारी मांडून त्यांचे निराकरण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहे. निवडीनंतर बोलताना फिरोज मासुलदार यांनी संघटनेच्या माध्यमातून ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न शासन स्तरावर सोडवण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न केले जातील तसेच संघटनेला अधिक बळकट करण्यासाठी कटिबद्ध राहणार असल्याचे सांगितले. या निवडीनंतर राज्यभरातून मासुलदार यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# रामभाऊ डाके यांचे निधन



**(बाळासाहेब मस्के/ दै.धर्मयोध्दा)**

**चारठाणा** - येथील जेष्ठ नागरिक रामभाऊ चिमाजी डाके(८५)वर्षे याचे दि.२ गुरुवार रोजीअल्पशा आजाराने निधन झाले,याच्या पार्थिवावर दि.३ शुक्रवार रोजी सकाळी११वा. येथील माळी समाज स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. याच्यापश्चात ४मुले,१मुलगी,सुनानातवंड,जावाईअसापरिवारआहे. पंढरीनाथ वस्त्र भंडार बोरी चे मालक अशोक डाके याचे वडील होतं.

# महापुरुषांच्या विचारांची पिढी घडावी - रविंद्रसिंह परदेशी -परभणीत क्रांतिसूर्य - प्रज्ञासूर्य संयुक्त जयंती महोत्सव

**(गजानन चव्हाण/ दै.धर्मयोध्दा)**

**परभणी** - स्वतःचा आणि समाजाचा विकास महापुरुषांच्या विचारानेच साध्य होऊ शकतो, म्हणून नव्या पिढीत महापुरुषांचे विचार रुजले पाहिजेत, यासाठी जयंतीनिमित्ताने समाज प्रबोधनाचे कार्यक्रम आवश्यक असल्याचे प्रतिपादन जिल्हा पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी यांनी केले. ते धम्ममैत्री संवाद अभियान, आम्ही भारताचे लोक आंबेडकरी सांस्कृतिक चळवळ व युगांधर फाउंडेशन यांच्यावतीने आयोजित क्रांतिसूर्य - प्रजासूर्य संयुक्त जयंती महोत्सवात येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक परिसरात बुधवारी(दि. १) बोलत होते.



या महोत्सवाचे उद्घाटन आयपीएस जीवन बेनिवाल यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी सुरेश हिवराळे हे होते. यावेळी महापौर सय्यद इकबाल, सेलूचे नगराध्यक्ष मिलिंद सावंत, आशाताई खिल्लारे, पोलिस निरिक्षक एम. एम. मांजरमकर, पोलिस निरिक्षक दंतुलवार, प्रा. डॉ. भीमराव खाडे, विठ्ठल कांगणे, प्रमोद कुटे यांची प्रमुख उपस्थिती होती. दरम्यान, युवकांत वर्तन विचारांचे असावे, तरच त्यांच्या भविष्याला योग्य दिशा मिळेल, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यासाठी आपण कटिबद्ध असल्याच्या भावना विठ्ठल कांगणे यांनी व्यक्त केल्या. गायिका राणी मस्के, गायिका भारती राऊत, दासराव पुंडगे, प्रा. शिवाजी कांबळे, संग्राम कीर्तने यांनी महाजलसा कार्यक्रमात क्रांतिकारी प्रबोधन गीते सादर केली. महोत्सवात जिल्हा पोलिस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी, प्रो. डॉ. भीमराव खाडे व विठ्ठल कांगणे यांना संविधानाची प्रास्ताविका भेट देऊन सन्मानित करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते नागवंशी महिला मंडळ शाक्यनगरी, स्त्रीशक्ती महिला मंडळ सेवकनगर, रमाई आंबेडकर महिला मंडळ खानापूर, महाबोधी महिला मंडळ ज्ञानेश्वरनगर, सुजाता महिला मंडळ, इंदुताई महिला मंडळ प्रियदर्शनीनगर यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

महोत्सव यशस्वितेसाठी गौतम भराडे, धम्मदिप रोडे, कचरू गोडबोले, गौतम पंडित, एम. एम. बरे, सुनिल पवार, राजकुमार येंगडे, प्रमोद अंभोरे, राहुल घनसावंत, इंजि. आकाश खिल्लारे, रवी वाहुळे, लखन सौंदरमल, संदिप खाडे, संजय घनसावंत यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन धम्ममैत्री संवाद आभियानाचे संजय बगाटे यांनी तर आभार युगंधर फाऊंडेशनचे संजीव आढगळे यांनी मानले.

# छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त विधान भवनात आदरांजली



**मुंबई** - हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त विधान भवनातील त्यांच्या सिंहासनाधिष्ठित पुतळ्यास महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहिली.

याप्रसंगी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे सचिव-१ जितेंद्र भोळे, उप सचिव विजय कोमटवार, उप सभापती यांचे खाजगी सचिव आविनाश रणखांब, वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र संचालक निलेश मदाने यांचेसह अन्य अधिकारी व कर्मचारी यांनीही छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार व गुलाबपुष्प अर्पण करुन आदरांजली वाहिली.

Dharmayoddha.com

# चारठाणा येथे श्री हनुमान जन्मोत्सव साजरा

**(बाळासाहेब मस्के/ दै.धर्मयोध्दा)**

**चारठाणा** - पवनसुत श्री हनुमान जयंती निमित्त पेठ विभागातील लहान मारुती मंदिर येथे १ एप्रिल रोजी संध्याकाळी भजनांचा कार्यक्रम होता. या कार्यक्रमात भगवान दादा राऊत,हरिभाऊ क्षिरसागर, किसनराव मस्के, विष्णु मामा वानखरे, विश्वनाथ काळे,बाळू कटारे,शिवाजी देशमुख, सदाशिव देशमुख विशाल देशमुख,शाम क्षिरसागर, भालचंद्र केदारी,शाहिर रघुनाथ क्षिरसागर, शाम क्षिरसागर,,वाघमुडे यांच्यासह



आदी भजनी मंडळी उपस्थित होती.२ एप्रिल रोजी सकाळी शेकडो भाविकांच्या उपस्थितीत श्री हनुमान जन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात आला. व या ठिकाणी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व कार्यक्रमाचे आयोजन कैलाश राऊत, अशोक आप्पा गजमल, रामकिशन मस्के, सुधाकर क्षिरसागर,शंकर कटारे,पिंटु गजमल, मनोहर वानरे,बालु खके, शिवशंकर तमशेटे,भिमा पवार, लक्ष्मण चोकनफळे,यादव मस्के यांच्या वतीने आयोजित करण्यात आले होते

# उद्धव कंठाळे राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित



**(गणेश सवणे/दै.धर्मयोध्दा)**

**सेलू** -जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बोरकिनी ता.सेलू येथील उपक्रमशील शिक्षक उद्धव श्रीरंगराव कंठाळे यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल ध्येय एज्युकेशन फाउंडेशन महाराष्ट्र राज्य यांच्यातर्फे राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले. ध्येय एज्युकेशन फाउंडेशन महाराष्ट्र राज्य आयोजित 'एज्युकेशन आयकॉन्स समिट -२०२६'अंतर्गत ग.दि. माडगूळकर नाट्यगृह निगडी, पुणे येथे ता.२९ मार्च रविवार रोजी पार पडलेल्या दिमाखदार सोहळ्यात राष्ट्रपती पुरस्कार विजेते शिक्षक दत्तात्रय वारे गुरुजी यांच्या हस्ते आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या उपमहापौर शर्मिला बाबर,पुणे जिल्हा परिषदेचे माध्यमिक शिक्षणाधिकारी डॉ.बाबासाहेब कारेकर , छत्रपती संभाजीनगरचे उपजिल्हाधिकारी शुभम पवार,ध्येय एज्युकेशन फाउंडेशनचे अध्यक्ष सुदामजी शेंडगे,उपाध्यक्ष सोमेश शिंदे, सचिव अर्चना शेंडगे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत उद्धव श्रीरंगराव कंठाळे सरांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. त्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

# लोकमान्य नगरात हनुमान जन्मोत्सवाची प्लास्टिक मुक्त महाप्रसाद पंगतीने सांगता

**परभणी** - येथील लोकमान्य नगरात मागील तीस वर्षांपासून दक्षिणमुखी हनुमान मंदिरात भव्य स्वरूपात हनुमान जन्मोत्सव साजरा करण्यात येतो तसेच या जन्मोत्सवात हजारो भाविक महाप्रसादाचा लाभ घेतात, यावर्षी सुप्रसिद्ध मधुमेह व हृदयरोग तज्ञ डॉ.श्री. राहूल आंबेगावकर यांच्या ''आपली परभणी,स्वच्छ परभणी'' फाउंडेशन च्या प्रेरणेतुन प्लास्टिक मुक्त हनुमान जन्मोत्सव साजरा करण्याचा संकल्प येथील विश्वस्त मंडळाने घेतला त्यासाठी या भव्य महाप्रसाद सोहळ्यासाठी स्टीलचे ग्लास,वाटी याची खरेदी करून पारंपारिक केळीच्या पानाचा वापर करून सदरील



पंगत करण्यात आली. प्लास्टिक चा वापर टाळून पर्यावरणाचे जास्तीत जास्त रक्षण कसे करता येईल यावर विश्वस्त मंडळ काम करीत असून भविष्यात देखील पर्यावरणाच्या रक्षणासाठी मंदिरात अश्याच पद्धतीचे आयोजन करणार असल्याची माहिती विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष श्री.अशोक ठाकूर यांनी दिली.

हा अभिनव उपक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष अशोक ठाकूर सदस्य अंबादास शिंदे,सुदाम जाधव,दादाराव भालके, माणिकराव कदम, बाळासाहेब गोंधळकर तसेच ''आपली परभणी,स्वच्छ परभणी'' फाउंडेशन चे मंगेश रत्नपारखी,दिपक कासांडे,चंद्रकांत दंडे,संदिप पाठक, शिवाजी वांगे,आनंद शिंदे,रामचंद्र भरड, श्रीधर कुलकर्णी,आनंद जोशी,श्रीधर कारेगावकर यांनी विशेष मेहनत घेतली, या अभिनव उपक्रमाचे सर्व स्तरावरून कौतुक होत आहे.

# फारुक पठाण यांच्या घरी आमदार संतोष बांगर यांची सदिच्छा भेट



**(ज्ञानेश्वर गिरी/ दै.धर्मयोध्दा)**

**कळमनुरी** - ईद मिलापच्या पवित्र निमित्ताने शिवसेनेचे निष्ठावंत कार्यकर्ते तथा ''मुस्लिम मावळा'' म्हणून ओळखले जाणारे फारुक पठाण यांच्या घरी कळमनुरी विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय व डॅशिंग आमदार संतोष बांगर यांनी सदिच्छा भेट दिली. या प्रसंगी कळमनुरी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष आर. आर. पाटील, उपनगराध्यक्ष शिवराज पाटील, शहराध्यक्ष तथा नगरसेवक बबलू पत्की, हिंगोली येथील नगरसेवक गणेश पहलवान, राजू भैया पटने, शिवसेनेचे गटनेते रवी शिंदे, नगरसेवक अयाज पठाण, मयूर शिंदे, कैलास पारवे, सतीश खर्जुले, भालेराव, शिवम नाईक, सुवर्णाताई गाबणे तसेच शिवसेनेचे सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या भेटीदरम्यान सर्व मान्यवरांनी एकत्र येत ईदच्या शुभेच्छा दिल्या आणि सामाजिक ऐक्याचा संदेश दिला. फारुक पठाण यांच्या कुटुंबियांनी पाहुण्यांचे स्वागत करून पारंपरिक शीरखुर्म्याचा आस्वाद देत सणाचा आनंद द्विगुणित केला. या कार्यक्रमात विश्वनाथ चौधरी पाटील आणि ऋतुराज बांगर यांचीही उपस्थिती लक्षवेधी ठरली. एकोप्याचा आणि बंधुभावाचा संदेश देणारी ही भेट कळमनुरीत चर्चेचा विषय ठरली आहे.

# शिक्षक कॉलनी येथील हनुमान मंदिरात हनुमान जयंती मोठ्या उत्साहात साजरी

**(गणेश जत्ती/ दै.धर्मयोध्दा)**

**पाथरी**- शहरातील शिक्षक कॉलनी येथील हनुमान मंदिरात यंदाची हनुमान जयंती अत्यंत उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. जागृत हनुमान मंदीर समिती आयोजित या उत्सवाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पहाटेच्या शुभमुहूर्तावर मंदिरात विशेष पूजा-अर्चा व अभिषेक करून उत्सवाची सुरुवात करण्यात आली. पहाटेपासूनच मंदिर परिसरात भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. त्यानंतर आयोजित भजन व कीर्तन कार्यक्रमांनी संपूर्ण परिसर भक्तिमय झाला. भजनी मंडळांनी सादर केलेल्या सुमधुर



भजन-कीर्तनांनी उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. मंदिराची रंगीबेरंगी फुलांनी करण्यात आलेली आकर्षक सजावट सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. प्रसन्न आणि मंगलमय वातावरणामुळे भक्तांच्या मनात भक्तिभाव अधिकच वृद्धिंगत झाला. लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्व वयोगटातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्री हनुमानाचे दर्शन घेतले. दि. ३ एप्रिल रोजी जागृत हनुमान मंदीर समितीच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. महाप्रसादासाठी मोठी गर्दी असूनही उत्कृष्ट नियोजनामुळे सर्वांना सुरळीतपणे प्रसादाचा लाभ मिळाला. कुठल्याही प्रकारची गैरसोय न होता कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन जागृत हनुमान मंदीर समीतीच्यावतीने अत्यंत शिस्तबद्ध व नियोजनपूर्वक केले. त्यांच्या प्रयत्नांमुळे उत्सव शांततेत, उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात संपन्न झाला.

एकूणच, शिक्षक कॉलनीतील हनुमान जयंती उत्सव हा भक्ती, एकात्मता आणि सामाजिक सलोखा यांचा सुंदर संगम ठरला.

# हनुमान जयंती निमित्त माजी आ.रोहिदास चव्हाण यांच्या हस्ते हनुमान चालीसा चे वाटप

**लोहा**- जुना लोहा शहरातील मारोती मंदिर येथे हनुमान जन्मोत्सव निमित्त शिवसेना (उबाठा) चे जेष्ठ नेते लातूर जिल्हा संपर्कप्रमुख माजी आमदार रोहिदास चव्हाण व सुर्यकांत गुरू सनपुरकर यांच्या हस्ते पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष मोहन पाटील पवार यांच्या वतीने उपस्थित हनुमान भक्तांना हनुमान चालीसा चे वाटप करण्यात आले.

प्रथमतः खरेदी विक्री संघाचे उपसभापती श्याम अण्णा पवार यांच्या हस्ते व माजी आ. रोहिदास चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत हनुमंत रायाचा अभिषेक करण्यात आला.तत्पुर्वी हनुमान गाथेचे वाचन सकाळी ५.३० ते ६.४५ या वेळेत सूर्यकांत गुरु सनपुरकर यांनी



केले. श्रीच्या आरती नंतर गुलाल उधळण्यात आला.यावेळी श्रवण व महाप्रसाद घेण्यासाठी गावातील उपस्थित सर्व भाविक भक्तांना यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे नांदेड (दक्षिणचे) जिल्हाध्यक्ष मोहन पाटील पवार यांच्या वतीने आयोजित हनुमान चालीसा चे वाटप शिवसेना उबाठा चे जेष्ठ नेते लातूर जिल्हा संपर्कप्रमुख माजी आमदार रोहिदास चव्हाण व सुर्यकांत गुरू सनपुरकर यांच्या हस्ते करण्यात आले.

हनुमान जन्मोत्सव निमित्त हनुमान चालीसा वाटप कार्यक्रमास माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, नगरसेवक, गोपाळ सावकार कवठेकर, हरिभाऊ चव्हाण, नामदेव पा. पवार, बालाजी अंकुलवार, शिक्षक नेते विठू भाऊ चव्हाण, बी.वाय. चव्हाण, काशिनाथ शिरशीकर सर, श्यामअण्णा पवार, किसन काळेसर, आप्पाराव पवार, लक्ष्मण कांजले, पत्रकार संजय कहाळेकर, हनुमंत पांचाळ, गजानन दांगटे, बबरू पा. पवार, गंगाधर पवार, मोहन मुंडे, गोविंद पवार, सूर्यकांत चव्हाण, दीपक चव्हाण, ऋतिक पवार, आदी हनुमान भक्त उपस्थित होते.

दैनिक धर्मयोध्दा हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक शिंदे रामेश्वर गणपतराव यांनी प्रविण प्रिटींग प्रेस शॉप नं.१४ सुपर मार्केट, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथे छापून धर्मयोध्दा कार्यालय, विकास नगर, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथुन प्रसिध्द केले. **संपादक-शिंदे रामेश्वर गणपतराव**

DHARMA YODDHA Daily Publisher, Printer, Owner by- Shinde Rameshwar Ganpatrao, Printed at Pravin Printing press Shop No 14 Super Market Karegaon Road Parbhani 431401 (M.S) And Published Dharmayoddha Karyalaya Vikas Nagar,Karegaon Road Parbhani. 431401 (M.S) Editor By - Shinde Rameshwar Ganpatrao